# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दतील मनपा शाळा क्र.२२/६२ ची नुतनीकरण करणे, या कामाकरीता शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत तसेच सन २०२४-२५ चा मुळ अर्थसंकल्प तयार करतांना सन २०२४-२५ करीता रु.९.०० कोटी तरतूद करणेत आली होती. तरतुद संपल्यामुळे सदर लेखाशिर्षामध्ये रु.५८५.०० लक्ष रुपायाचे पुर्नविनियोजन करणेत आले होते, अशी एकूण रु.१४८५.०० लक्ष तरतूद मधून रु. १४६७.१० लक्ष तरतूद खर्च झाले असून रु. १७.९० लक्ष शिल्लक आहेत. जिल्हाधिकारी नियोजन अधिकारी,ठाणे, महाराष्ट्र शासन,जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत खालील विकास काम करण्यासाठी रुपये १,९९,९९,६९४/- इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. १३९,९९,७७९/-) इतका राहणार आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.५९,९९,९०५/- ) इतका आहे. सदरचे काम ठेकेदार यांनी विहीत मुदतीत पुर्ण केले असून सदर कामाचे देयक कनिष्ठ अभियंता ,प्र.स.क्र.२ यांनी सादर केलेले आहे. मात्र देयकासाठी शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी अपुरा असल्याने बांधकाम विभागाकडून निधीचे पुर्नविनियोजन करणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.८/११/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. ८/११/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. १४८५.०० लक्ष | रु. १४६७.१० लक्ष | रु.१७.९० लक्ष | |
| | एकूण | रु. १४८५.०० लक्ष | रु. १४६७.१० लक्ष | रु.१७.९० लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामध्ये शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधील निधी कमी असल्यामुळे खालील कामाचे अंदाजपत्रक रु.१९५,०५,३७५/- इतक्या रक्कमेचे आहे. त्यातील मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.५९,९९,९०५/- ) होत असून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. खालील कामाचे देयक ठेकेदार यांना देणे गरजेचे आहे. बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु. ६०.०० लक्ष रुपयाचे शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

विकास कामाचे नाव खालील प्रमाणे-

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दतील मनपा शाळा क्र.२२/६२ ची नुतनीकरण करणे. | रु.१९९,९९६८४/- |
| | एकूण | रु.१९९,९९६८४/- |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. ८/११/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. ८/११/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाळेच्या इमारती बांधणे | १००.०० | ०.०० | १००.०० | ६०.०० |
| | एकूण | रु. १००.०० लक्ष | रु. ०.०० लक्ष | रु. १००.००लक्ष | रु.६०.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा.ो. यांच्याकडे निहीत आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्र.२२/६२ ची नुतनीकरण करणेचे काम ठेकेदार यांनी विहीत मुदतीत पुर्ण केलेले असून कामाचे देयक कनिष्ठ अभियंता ,प्र.स.क्र.२ यांनी सादर केलेले आहे. मात्र मनपा हिस्याची ३० टक्के रक्कम (रु.६०.०० लक्ष) निधी अपुरा असल्यामुळे देयक प्रलंबित आहे. तरी रु.६०.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणेकामी मुळ संचिकेसह प्रस्ताव तयार केलेला आहे. त्या अनुषंगाने शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये बांधकाम विभागाकडील शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्षामधून रु.६०.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक /११/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ८८९ **दिनांक** १३ **/११/२०२४**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा क्र.२२/६२ ची नुतनीकरण करणेचे काम ठेकेदार यांनी विहीत मुदतीत पुर्ण केलेले असून विकास काम करण्यासाठी रुपये १,९९,९९,६९४/- इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. १३९,९९,७७९/-) इतका आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.५९,९९,९०५/- ) इतका आहे. कामाचे देयक कनिष्ठ अभियंता ,प्र.स.क्र.२ यांनी सादर केलेले आहे. मात्र मनपा ३० टक्के हिस्सा (रु.५९,९९,९०५/- ) इतका असून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. तरी बांधकाम विभागाकडील शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्षामधून रु.६०.०० लक्ष निधीचे लक्ष निधीचे शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणे गरजेचे आहे, सबब निधी पुनर्विनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च (रक्कम लाखात) | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ/१/१ शाळेच्या इमारती बांधणे | सन २०२४-२५ करीता रु.१०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.०.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१००.०० लक्ष | महसुली खर्च भाग-२ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | सन २०२४-२५ करीता रु.१४८५.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१४६७.१० लक्ष | ६०.०० | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.६०.००लक्ष निधीचे सदर शिर्षामधुन पुर्नविनियोजनाने रककम वर्ग करणेत येत आहे. |
| | | एकूण | | | | | | | | रु.६०.०० | |

टिपणीत नमूद केल्याप्रमाणे:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शहर अभियंता<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा परिक्षक<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>भिवंडी नि.शहर मनपा | अति. आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा | प्रशासक तथा आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा |